


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख १७ मे, १९५० अंक २०

## बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल, जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

मुंबईः—६५।६७ हल्डेरी बझार. | पुणेंः—१२६८ भवानी पेठ.
अहमदनगरः—बझार पेठ. | बेलापूररोडः—पोस्टासमोर,
कल्याणः—शिवाजी चौक. | भिवंडीः—बझार पेठ.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया, अध्यक्ष.

" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " बिरदीचंद भूरमंद बांठिया.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)
श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील, पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी, अहमदनगर.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

*विशेष माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.*

जी. बी. साठे, जनरल मॅनेजर.

## धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.
शाखाः बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर
बँक ऑफ सिटिझन्स लि.
बेळगांव.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**अमेरिकन नागरिकांचा आहार**—अमेरिकन सरकारच्या शेतकी खात्यातर्फे आहारविषयक एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यांतील माहितीप्रमाणें अमेरिकन नागरिकांच्या आहारांत कसाच्या दृष्टीनें युद्धोत्तर काळांत फारसा फरक पडलेला नाहीं. चालू वर्षी दररोज प्रत्येक नागरिकाला ३,२५० कॅलरी उष्णता पुरविण्याइतकें अन्न मिळेल असा अंदाज आहे. गेल्या वर्षीपेक्षां ह्या वर्षी १० कॅलरी अधिक मिळणार आहे.

**फक्त अविवाहित स्त्रियांसाठीच**—भारताच्या परराष्ट्रीय खात्यांत फक्त अविवाहित स्त्रियांनाच नोकरी देण्यांत येणार आहे. अपत्य नसलेल्या विधवांनाही ह्या खात्यांत प्रवेश मिळेल. अशा स्त्रियांनीं विवाह अगर पुनर्विवाह केल्यास त्यांना कामावरून दूर करण्यांत येईल. ह्या अटीवरच नेमणुका करण्यांत येणार आहेत.

**पंजाबमधील वानर सत्र**—पंजाबच्या १३ जिल्ह्यांत मिळून फेब्रुआरी १९५० अखेर सुमारें ३६,००० वानरांना गोळ्या घालून मारण्यांत आलें. माकडें मारल्याचा पुरावा म्हणून त्यांच्या शेपट्या मॅजिस्ट्रेटपुढें दाखल कराव्या लागतात. त्याच त्याच शेपट्या पुन्हा दाखवितां येऊं नयेत म्हणून मॅजिस्ट्रेटसाहेब त्या आपल्या देखरेखीखालीं नष्ट करून टाकतात.

**सीलोन रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर**—अमेरिकेंतील एक बँकिंग तज्ज्ञ मि. जॉन एक्झटर ह्यांना सीलोनच्या रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची जागा देऊं करण्यांत आली आहे. अमेरिकन सरकारनें सीलोनला बँकिंगविषयीं सल्ला देण्यासाठीं त्यांना त्या देशांत पाठविलें होतें. सीलोनच्या आर्थिक साधनसामुग्रीचा विकास करण्यासाठीं त्यांच्यासारख्या तज्ज्ञाची जरूरी आहे, म्हणून सीलोन सरकार अमेरिकेकडे त्यांची मागणी करणार आहे.

**नर्सेसची टंचाई**—जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीप्रमाणें, जगांत नर्सेसचा तुटवडा असल्यामुळें आरोग्यविषयक योजना पार पाडल्या जात नाहींत अशी स्थिति आहे. कांहीं देशांतून दर चारशें लोकसंख्येला एक नर्स असें प्रमाण पडतें; तर इतर कांहीं देशांतून लक्षावधि नागरिकांमागें एक नर्स असें प्रमाण पडतें. पुढारलेल्या देशांतून सुद्धा नर्सेस इतक्या कमी आहेत कीं इस्पितळांत रोग्यांच्या खाटा रिकाम्या असून सुद्धां नर्सेसच्या अभावीं रोग्यांना दाखल करून घेतां येत नाहीं.

**संयुक्त प्रदेश राज्यांतील करमणुकीचा कर**—मार्च १९५० रोजीं पुऱ्या झालेल्या ७ महिन्यांत संयुक्त प्रदेश सरकारनें ६२ लाख रुपये करमणुकीवरील करांच्या रूपानें गोळा केले. राज्यांत २०२ सिनेमागृहें आणि ९० फिरते सिनेमा आहेत. वरील कालावधींत ३ कोटी लोकांनीं सिनेमाचे खेळ पाहिले असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ब्रिटनमधील भारतीय मतदार**—ब्रिटनमध्यें नुकत्याच झालेल्या पार्लमेंटच्या निवडणुकांत १५,००० भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क होता; त्यांपैकीं १०,००० नागरिकांनीं तो बजावला.

**रशिआंतील वृत्तपत्रें आणि नियतकालिकें**—रशिआंत सुमारें ७,२०० वृत्तपत्रें प्रकाशित होतात. त्या सर्वांचा मिळून खप ३·२ कोटी प्रतींपेक्षां अधिक असावा असा अंदाज आहे. शास्त्रीय, राजकीय, आर्थिक, कलाविषयक आणि इतर नियतकालिकें मिळून १,७६० प्रसिद्ध होतात. त्या सर्वांचा मिळून खप २ कोटी प्रती होतो. त्याशिवाय कारखाने, सामुदायिक शेतवाड्या अगर इतर संस्थांत मिळून १,००,००० 'भिंतींवरील वृत्तपत्रें' निघतात.

**चित्रपटगृहांवर निर्बंध**—मद्रास सरकारनें सिनेमागृहांना परवाने देण्यासंबंधीं लोकसंख्येवर आधारलेले कांहीं नवीन निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. ज्या गांवीं ५०,००० पेक्षां अधिक वस्ती असेल त्या गांवांत कायमच्या सिनेमागृहांच्या संख्येवर निर्बंध घालण्यांत येणार नाहींत. २० हजार लोकसंख्येपेक्षां जास्त परंतु ३० हजारापेक्षां अधिक नाहीं, अशा गांवांत एक कायमचा सिनेमा आणि एक फिरता सिनेमा ह्यांना परवाना देण्यांत येईल. लोकसंख्या ३० ते ४० हजार असेल तर दोन कायमचे आणि एक फिरता सिनेमा, ४० ते ५० हजार पर्यंतच्या गांवांना २ कायमचे आणि २ फिरते सिनेमा, ५० हजारांवर लोकसंख्या असलेल्या गांवाच्या तीन मैलांच्या परिघांत फिरत्या सिनेमाला परवाना देण्यांत येणार नाहीं.

**आपल्या मालकीचा फोन**—स्वतःच्या मालकीचा टेलिफोन घेण्याच्या योजनेला मुंबई शहरांत चांगला पाठिंबा मिळत आहे. ता. १ जानेवारी १९५० पासून ह्या योजनेला प्रारंभ झाला. तेव्हांपासून एकूण ३,१५१ अर्ज आले आणि ७९ लाख रुपये जमा झाले. आतांपर्यंत ९७० अर्जदारांना टेलिफोन देण्यांत आले आहेत.

**लष्करी विमानांचें उत्पादन**—हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरीच्या संचालकांची बैठक बंगलोर येथें नुकतीच भरली होती. सध्या लष्करी विमानांची जुळवाजुळव करण्याचें काम कंपनीनें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. नंतर आधुनिक पद्धतीचीं मोठीं लष्करी विमानेंही कंपनी बनविणार आहे. एका परदेशीय कंपनीशीं ह्यासंबंधीं करार करण्यांत आला आहे.

**अमेरिकेंतील छोट्या धंद्यांना मदत**—अमेरिकेंतील स्वतंत्र छोट्या धंद्यांना मदत करण्याची एक योजना प्रे. ट्रुमन ह्यांनीं जाहीर केली आहे. अमेरिकेंतील ४० लाख उद्योगधंद्यांपैकीं ९० टक्के कंपन्यांची गणना अशा छोट्या धंद्यांत होते. ह्या धंद्यांतून २ कोटी लोकांना काम मिळतें. ह्या कंपन्यांनीं आपली उपयुक्तता पटवून दिल्यावर, त्यांना अल्प आणि दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यासाठीं खास कंपन्या काढण्यांत याव्या, अशी प्रे. ट्रुमन ह्यांची योजना आहे.

**ब्रह्मदेशाला कर्ज**—कम्युनिझमच्या लाटेला थोपवून धरण्यासाठीं ब्रह्मदेशाच्या सरकारला ३७,५०,००० पौंड कर्ज देण्यास ब्रिटिश पार्लमेंटनें मंजुरी दिली आहे. ब्रिटिश राष्ट्रसंघानें ब्रह्मदेशाला द्यावयाच्या ६०,००,००० पौंड कर्जांपैकीं ही रक्कम आहे. उरलेलें कर्ज भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिआ आणि सीलोन ह्यांनीं द्यावयाचें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ मे, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिडने परिषदेचें हिंदच्या दृष्टीनें महत्त्व

१५ मेला सिडने येथें भरणारी कॉमनवेल्थ मंत्र्यांची परिषद साम्राज्यांतील घटक राष्ट्रांच्या दृष्टीनें व त्यांतल्या त्यांत आशिया खंडांतील राष्ट्रांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. कारण या परिषदेमध्यें ऑस्ट्रेलियाचे प्रधान मि. स्पेंडर यांनीं पुरस्कारिलेल्या योजनेचा विचार केला जाणार आहे. आशिया खंडांतील कॉमनवेल्थमधील राष्ट्रांचा परस्परांशीं व इतर देशांशीं व्यापार वाढावा हा स्पेंडर यांच्या योजनेचा मुख्य हेतु आहे. हा हेतु साध्य करण्यासाठी दक्षिण व आग्नेय आशियांतील देशांचें उत्पादन कसें वाढवावें व तेथील लोकांचें राहाणीचें मान कसें वाढवावें याचा विचार मुख्यतः केला जाईल. त्याचप्रमाणें निरनिराळ्या देशांमधील कांहीं प्राथमिक वस्तूंच्या किंवा कच्च्या मालाच्या व्यापाराच्या बाबतींत कराव्या लागणाऱ्या करारांचाहि या परिषदेंत विचार केला जाईल. या देशांपैकीं मागासलेल्या भागांची आर्थिक प्रगति एकमेकांच्या संघटित प्रयत्नांनीं कशी घडवून आणतां येईल याबद्दलहि योजना आंखण्यांत येईल किंवा अशा योजनेच्या दृष्टीनें पूर्वचर्चा केली जाईल. ऑस्ट्रेलियाचा हिंदशीं चालणारा व्यापार गेल्या दोन वर्षांत सुमारें ७० टक्क्यांनीं वाढला आहे. ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या महायुद्धांत विशेष महत्त्व प्राप्त झालें व हें महत्त्व आशिया खंडाच्या दृष्टीनें टिकून राहाणें व त्याची वाढ होणें ऑस्ट्रेलियाला आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियाला अशा प्रकारें पुढारीपण मिळविण्याची इच्छा असली तरी भांडवल व मनुष्यबळ या दोहोंच्या दृष्टीनें ऑस्ट्रेलियाची परिस्थिति कमकुवत आहे. तेव्हां परिणामीं ऑस्ट्रेलियाचें महत्त्व शक्य होणाऱ्या उत्पादन-वाढीवर व परराष्ट्रांशीं चालणाऱ्या व्यापाराच्या वाढीवर अवलंबून आहे.

आशिया खंडांतील देश आपल्या दारिद्र्याविषयीं प्रसिद्ध आहेत. यापैकीं कांहीं देशांची मूलभूत आर्थिक परिस्थिति विकास-योजनेला साधारण अनुकूल असली तरी राजकीय अस्थिरतेमुळें त्यांची परिस्थिति चमत्कारिक झाली आहे. अशा प्रकारची परिस्थिति असलेले देश म्हणजे ब्रह्मदेश व इंडो-चायना व इंडोनेशिया हे आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदसारख्या देशांत दर वर्षी सुमारें तीस लक्ष लोकांनीं वाढत जाणारी लोकसंख्या, सुमारें ३० ते ४० लक्ष टन धान्याची करावी लागणारी आयात, भांडवलाचा तुटवडा व यंत्रज्ञ तरुणांचा अभाव या आर्थिक प्रगतीच्या आड येणाऱ्या मुख्य गोष्टी आहेत. या प्रमुख गरजांचा विचार सिड्ने परिषदेंत होऊं शकला तरच त्या परिषदेंतील चर्चा हिंदच्या दृष्टीनें फायदेशीर ठरूं शकेल. हिंदचे उद्योगधंदे वाढून राहाणीचें मान वाढलें तर त्याचा अनुकूल परिणाम व्यापाराच्या रूपानें आशिया खंडांतील इतर देशांवर होणें अगदीं शक्य आहे. परंतु हिंद आहे तसाच दरिद्री राहिला व गेल्या तीन वर्षांत ज्याप्रमाणें हिंदची आर्थिक क्षेत्रांत प्रगति झाली नाहीं, तशीच स्थिति कायम राहिली तर हिंदची ही परिस्थिति संसर्गजन्य रोगांप्रमाणें इतर देशांनाहि कांहीं प्रमाणांत भोंवल्याशिवाय राहाणार नाहीं. तरी सिडने परिषदेंत हिंदच्या या मूलभूत प्रश्नांचा विचार होणें आवश्यक आहे.

## जपानची स्पर्धा जाणवूं लागली

फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे एक प्रतिनिधी मि. मॉरिस वॅट ह्यांनीं हिंदुस्थान, पाकिस्तान, सीलोन आणि ब्रह्मदेश ह्या चार देशांत नुकताच एक दौरा काढला होता. ह्या दौऱ्यांत त्यांनीं २७,००० मैलांचा प्रवास करून ठिकठिकाणच्या बाजारपेठांची पाहणी केली. त्यांना असें आढळून आलें कीं वरील सर्वच देशांत जपानची स्पर्धा ब्रिटिश कारखानदारांना जाणवूं लागली आहे. निर्यात मालाची बाजारपेठ म्हणूनच केवळ नव्हे, तर औद्योगिक यंत्रसामुग्री बाबतही जपानची चढाओढ ब्रिटिश कारखानदारांना जाचत असावी असें मि. वॅट ह्यांच्या लंडनमधील वक्तव्यावरून दिसतें. मि. वॅट ह्यांनीं निरनिराळ्या देशांतील परिस्थिती पुढीलप्रमाणें वर्णन केली आहे: —

**भारत**—भारताची फाळणी झाल्यापासून बरीच प्रगति करण्यांत आली आहे. तथापि सरकारी आणि खाजगी औद्योगिक योजना मंदगतीनेंच अंमलांत आणण्यांत येत आहेत. त्यामुळें देशांत कांहींसें नैराश्याचें वातावरण पसरलें आहे. भारताला आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यांत यश आलें तर, ह्या देशांत औद्योगिक यंत्रसामुग्रीला बरींच वर्षें चांगली बाजारपेठ मिळूं शकेल.

**पाकिस्तान**—ह्या देशानेंही गेल्या अडीच वर्षांत चांगली प्रगति केली आहे. पाकिस्तानला आपली आर्थिक व्यवस्था पहिल्यापासून नव्यानें बसवावी लागली. पाकिस्तान आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या भक्कम पायावर उभें करण्याचा त्या राष्ट्राच्या सरकारचा निश्चय आहे.

**सीलोन**—सीलोनची भरभराट चहा, रबर आणि खोबरें ह्या तीन वस्तूंच्या जागतिक बाजारांतील किंमतीवर मुख्यतः अवलंबून आहे. बेटांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें आणि निर्यात व्यापार वाढविणें ह्या दोन गोष्टींवर सीलोनचें भवितव्य अवलंबून आहे. देशांत उत्पन्न होणाऱ्या शेतीच्या मालापासून ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांची वाढ होणेंही अवश्य आहे. असें झालें तरच त्या देशांतील लोकांच्या रहाणीचें मान वाढेल.

**ब्रम्हदेश**—दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या परिस्थितीची तुलना करतां सध्याची परिस्थती निराशाजनक आहे. कॉमनवेल्थ देशांनीं ६० लाख पौंडांचे देऊं केलेलें कर्ज ब्रम्हदेशांत स्थिरस्थावर होईल ह्या आशेवर दिलेलें आहे. ब्रम्हदेशांतील लोकांना उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेबद्दल अजून बरेंच शिकावयाचें आहे. राष्ट्राभिमानामुळें ह्या गोष्टी ते टक्केटोणपे खाऊन शिकत आहेत. परंतु ब्रम्हदेशांत नैसर्गिक संपत्ति पुष्कळ आहे. सध्या ती वाया जात आहे. संपत्तीचा जसजसा उपयोग केला जाईल त्या प्रमाणांत ब्रम्हदेश प्रगति करील ह्यांत शंका नाहीं.

## दि रत्नाकर बँक लि. ची वार्षिक सभा

### अध्यक्ष श्री. बी. बी. पाटील, यांचें ६ व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण

गेल्या सहा वर्षांत बँकेची प्रगति कसकशी होत गेली याची कल्पना यापुढें जी माहिती दिली आहे त्यावरून करून येणार आहे.

(आंकडे हजारी)

| साल | वसूल भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | हुंड्या, बिलें व इतर कर्जे | कर्जरोखे. | कॅश व बँक शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १९४७ | ३१४ | ३० | २६७१ | १७६५ | २०८ | ११२५ |
| १९४८ | ३१४ | ४० | ३८०५ | २३७० | ६०९ | १२४८ |
| १९४९ | ५०३ | ५१ | ३५५१ | १८५३ | ७५७ | २०२६ |

| | १९४७ | १९४८ | १९४९ |
|---|---|---|---|
| सेव्हिंग्ज ठेवी | ८३१ | ११७७ | १३६९ |
| मुदत ठेवी | ७२८ | ७६० | ८९३ |

रिपोर्टाचे सालीं कॅश व बँक शिल्लक बरीच वाढल्याचें दिसतें व त्या मानानें कर्जें कमी दिसतात. याचें मुख्य कारण १९४९ अखेरी कॅशक्रेडिट खात्याप्रमाणेंच मुदत हुंडी खात्यावरील कर्जें भागवून घेण्याचा नवीन सुरू केलेला उपक्रम हें होय. अनुभवांतीं असें आढळून आलें आहे कीं, एकाच खातेदाराची अनेक बँकांतून कर्जें असत व तीं सतत फिरती ठेवलीं जात. मुदतहुंडीवर कर्ज काढून कॅशक्रेडिट खातें पुरें केलें जात असे व अशामुळें खातेदारांची खरी कसोटी व पत कळून येत नसे. बँकेकडून प्रमाणाबाहेर कर्जें काढणें व फारसा विचार न करतां तीं गुंतविणें ही गोष्ट हल्लीच्या नाणेभीडीच्या दिवसांत व्यापाऱ्यांना फारशी हितावह नाहीं. त्यांनीं आपल्या गरजा योग्य प्रमाणांत ठेवणें अधिक हितकर आहे. असें जे व्यापारी करणार नाहींत त्यांना भावी कालांत वरील प्रकार थोडा फार त्रासाचा व जिकीरीचा होईल. ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें तर यामुळें अधिक दक्षता घेणें जरूर आहे.

विश्वासानें जमा केलेल्या ठेवींचें योग्य रक्षण करणें हें चांगल्या बँकांचें मुख्य व महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळें कर्जें योग्य प्रमाणाबाहेर वाढूं न देणें व दिलेल्या कर्जांची वसूली वेळेवर करण्यांत योग्य ती दक्षता घेणें अगदीं जरूर आहे. बँकेच्या यशाचा हा पाया आहे.

मध्यवर्ती सरकारनें आतांपर्यंत अवलंबिलेली स्वस्त दरानें चलन निर्माण करणेची पॉलिसी (*Cheap Money Policy*) आतांपर्यंत फारशी यशस्वी झालेली नाहीं. सुखवस्तु मध्यम वर्गाकडून सुरक्षितपणाच्या गुंतवणुकी (*Investments*) वाढविणेसाठीं त्यांना चालू परिस्थितीच्या मानानें योग्य व्याज देणें अगदीं जरूर आहे. तें न दिसल्यास अत्यंत उपयुक्त असा पैसा इतक्या नाणेभीडीच्या दिवसांत ठेवरूपानें येणें कठीण होईल. तेव्हां या दृष्टीनें आपल्या बँकेच्या व्याज देण्याच्या धोरणांत बदल करणेची तूर्त गरज दिसत नाहीं.

बँकेचें धोरण अत्यंत सावधतेचें व संयमाचें असून नफ्याच्या वाढीकडे लक्ष न देतां बँकेची एकंदर इभ्रत, ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास, व्यापाऱ्यांचें दळण वळण व देवघेव व इकडील आर्थिक प्रपंचांतील आपलें महत्त्वाचें स्थान हें संतत वाढविण्याकडे व वाढवून तें टिकविण्याकडे बँकेचें लक्ष कटाक्षानें आहे.

सामान्यतः देशांतील वातावरण आजतरी मनाला प्रसन्न वाटणारें नाहीं. हिंदुस्थानचे व पाकिस्तानचे संबंध दिवसेंदिवस बिघडूं लागले आहेत. काश्मिरचा प्रश्न अद्याप अनिर्णितच आहे. सर्व तऱ्हेच्या व्यापारावर निरनिराळ्या तऱ्हेचीं नियंत्रणें बसलीं आहेत. मंदी निर्माण करण्यासाठी सरकारनें केलेली सर्व उपाययोजना फारशी यशस्वी झालेली नाहीं. बेकारी वाढूं लागली आहे, महागाई पराकाष्ठेची झालेली आहे, व्यापाऱ्यांचा वसूल वेळेवर न आल्यानें व बँकांवरील कर्जांच्या निर्बंधामुळें नाणेभीड वाढतच आहे. मध्यम वर्गावरील कराचें ओझें असह्य झालें आहे. चोऱ्या, लूट, मारामाऱ्या वाढीस लागलेल्या आहेत. एकूण परिस्थिति बरीच अडचणीची व काळजी निर्माण करण्यासारखी झाली आहे.

बंगालमधल्या कांहीं बँकांचें एकत्रीकरण झाल्याचें आपण वाचलेंच असेल. संस्थानांचें विलीनीकरण करून जसा भारताचा नकाशा बदलला गेला तसा बँकांचें एकत्रीकरण करून आर्थिक स्थिरता वाढवावी असा एक विचार निर्माण झाला आहे व तो हळूहळू वाढीस लागला आहे. तेव्हां आपलें स्वतंत्र अस्तित्व स्थिर व भक्कम पायावर टिकविण्यासाठी आपली शक्ति मोठी करणें हा एकच उपाय आहे. ही शक्ति वाढविण्याचा एकच राजमार्ग म्हणजे खेडोपाडीं, इष्टमित्रांत बँकेचा योग्य प्रचार करून दैनंदिन जीवनांत बँकेची गरज निर्माण करणें व तिच्यामार्फत आपला सर्व व्यवहार करणें, ठेवी वाढविणें—थोडक्यांत बँकिंगची सवय निर्माण करणें व वाढविणें हें होय.

यापुढील २।३ वर्षांत आपल्या बँकेचें खेळतें भांडवल किमान एक कोटी रुपयांचें तरी व्हावें, अशी महत्त्वाकांक्षा धरून आपण प्रयत्न कराल तर आपली निराशा होणार नाहीं असा मला विश्वास वाटत आहे. या इच्छित ध्येयांत यश मिळविण्यासाठी आपणा सर्वांच्या एकजुटीच्या व एकदिलाच्या सहकार्याची मदत होऊन आपल्या बँकेचें नांव व बँकेची कीर्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाईल अशी उत्कट आशा मी प्रदर्शित करितों. सांगलींत मध्यवस्तींत व अत्यंत सोईची जागा बँकेनें खरेदी घेतली व तिचा कबजाहि नुकताच मिळाला आहे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं इमारत फंडासाठी आपल्या फीतील कांहीं भाग 'श्री' फल म्हणून देणगी देऊन बांधकामास सक्रिय सहानुभूति दाखविली आहे.

---

### दि राजाराम मिल्स अँड इंडस्ट्रीज लि., कोल्हापूर

वरील कंपनीचें खेळतें भांडवल १९४७ अखेर ८८,६८९ रु., १९४८ अखेर १,३३,९१८ रु. व १९४९ अखेर १,४०,५७० रु. आहे. ह्या आकड्यांवरून कंपनीची प्रगति दिसून येत आहे. "करवीर जनतेच्या लहान-मोठ्या धंद्यांना सक्रिय उत्तेजन देऊन आपल्या भारत सरकारनें आंखलेल्या उद्योगधंद्यांचे वाढीस संस्था सतत सहकार्य देत आहे. त्याचप्रमाणें भारताची आजची गरज अधिक धान्योत्पादन ही असल्यानें कंपनीनें शेती–क्षेत्रांतहि अक्षय्यतृतीयेच्या सुमुहूर्तावर पदार्पण केलें आहे. संस्थेचा व्यवहार दिवसा व रात्रौ दोन्हीहि वेळीं चालू असल्यानें श्रमजीवी, प्रतिष्ठित तसेच व्यापारी वर्गासहि त्याचा लाभ घेतां येतो." कंपनीचें वसूल भांडवल ३१,९६२ रु. असून तिचेकडे ९८,३७७ रु. च्या ठेवी आहेत. तिनें ८७,१९८ रु. कर्जाऊ दिलेले आहेत आणि ४५,६१९ रु. रोख हातांत व बँकेंत आहेत. अहवालाचे वर्षी कंपनीस २,८९१ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांना द. सा. द. शे. रु. ४ आ. ६ प्र. १२०० रु. डिव्हिडंड देण्यांत आलें. कंपनीनें यंदा दोन उत्साही डायरेक्टर (१) श्री. शंकरराव दादासाहेब जाधव व (२) श्री. गुलाम हुसेन साहेब बसा पैलवान ह्यांना बोर्डावर घेतलें आहे. (चेअरमनः श्री. केशवराव रामचंद्रराव मोहिते. मॅ. एजंटसः मेसर्स राजाराम एजन्सीज [श्री. पां. गो. चव्हाण व श्री. म. आ. यादव.]) कंपनीची वार्षिक सभा ता. ६ मे रोजीं झाली.

## मॅनेजिंग एजन्सीची उपयुक्त कामगिरी

### टाटा इंडस्ट्रीजचें निवेदन

("संपदा" मासिकाच्या ताज्या अंकांतील श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या लेखामधील भाग)

वास्तविक, भारतांतील औद्योगिक प्रगति मॅनेजिंग एजन्सी पद्धतीच्या पायावरच आधारलेली आहे. कोळसा, लोखंड-पोलाद, ताग, कापड, वीज, साबण, तेल, साखर, इत्यादींचे कारखाने मॅनेजिंग एजंटांनींच काढले व वाढविले. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करून मॅनेजिंग एजन्सी पद्धतीची उपयुक्तता आतां उरलेली नाहीं, असें सांगण्यांत येत आहे. कोणतीहि मोठी कंपनी काढतांना तिला मॅनेजिंग एजन्सी फर्मचा मजबूत आधार लागत असे. हे उत्पादक बरेच शेअर्स घेत, चालू भांडवलाची उभारणी करीत, कारखान्याची व्यवस्था पहात आणि कंपनीच्या देण्यास जरूरीप्रमाणें जामीन रहात. मॅनेजिंग एजंट हे बहुधा सधन असत आणि कंपनीला स्वतः तरी भांडवल पुरवीत किंवा स्वतःच्या पतीवर बँकांमार्फत त्याची व्यवस्था करीत. अनुभवानंतर ही पद्धति इतरहि क्षेत्रांत वाढली. प्रारंभीं भागीदारीच्या पेढ्या किंवा व्यक्ति ह्यांच्याकडेच मॅनेजिंग एजन्सी असे. औद्योगिक वाढीबरोबर व्यवस्थेच्या अडचणी व गुंतागुंतीहि वाढल्या आणि मॅनेजिंग एजन्सीच्या भागीदारांवर अधिकाधिक ताण पडूं लागला. साहजिकच त्यांनीं आपलें रूपांतर खासगी लिमिटेड कंपन्यांत केलें. आज बहुतेक सर्व मोठ्या कारखान्यांच्या मॅनेजिंग एजन्सीज अशा लिमिटेड कंपन्यांकडेच आहेत. अशा रीतीनें प्रगति होत असतांना कित्येक चांगल्या कार्यपद्धति निर्माण होत गेल्या, त्यामुळें औद्योगीकरणास मदत होऊन भागीदारांचा व जनतेचा विश्वास वाढण्यास मदत झाली. त्यांतील कांहींचें दिग्दर्शन येथें केलें आहे.:—

(१) कंपनी उभारण्यापूर्वी पूर्वचौकशीचें काम मॅनेजिंग एजंट करीत आलेले आहेत. अशा चौकशीस कित्येक वर्षेंहि लागत. ती पुरी होऊन योजना तयार झाली म्हणजे कंपनीची स्थापना केली जाई. ह्यामुळें कंपनीची उभारणी आणि प्रत्यक्ष कामास प्रारंभ ह्यांत फार वेळ जात नसे. कित्येक योजनांनीं मूर्त स्वरूप कधींच धारण केलें नाहीं, तरी त्यांच्या पूर्वचौकशीच्या खर्चाचा बोजा मॅनेजिंग एजंटांवर पडला. उदाहरणार्थ, कोयना धरणयोजनेची पूर्वतयारी टाटा कंपनीनें २५ वर्षांपूर्वी सुरू केली होती. मुंबई सरकारनें ती योजना नुकतीच हातीं घेतली, तेव्हां कंपनीनें आपले नकाशे, आंकडेवार पत्रकें, इत्यादि कागदपत्र सरकारच्या हवालीं कांहींहि मोबदला न घेतां केले. ह्या पूर्वतयारीवर टाटा कंपनीचे लाखों रुपये खर्च झाले होते.

(२) आपल्या देशांत उद्योगधंद्यांत गुंतवणुकीसाठी भांडवल उत्साहानें पुढें येत नाहीं. मॅनेजिंग एजंट, त्यांचे मित्र व सहकारी यांनीं नव्या कंपनीचे बरेचसे शेअर्स घेतल्यानें पैसे गुंतविणारांत बराच विश्वास निर्माण होतो. सध्याची पैशाच्या गुंतवणुकीची विशिष्ट अडचणीची परिस्थिति सोडली, तर मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचें हें बहुमोल कार्य पूर्वी महत्त्वाचें होतें, तसेंच तें पुढेंहि राहील, ह्यांत संशय नाहीं. मॅनेजिंग एजन्सीच्या जागीं दुसरी पद्धति कायद्याच्या बळावर सुरू करण्याचा दुष्परिणाम आजच्या परिस्थितींत कदाचित् दिसला नाहीं तरी तो अनुभवास आल्याविना रहाणार नाहीं; गुंतविणारे पुढें येणारच नाहींत, असें टाटा इंडस्ट्रीजचें स्पष्ट मत आहे.

(३) व्यक्तीप्रमाणें कंपन्या आपण होऊन कांहीं करूं शकत नाहींत. तेव्हां कंपन्यांच्या दैनंदिन व्यवस्थेची जबाबदारी पत्करणारे लोक आवश्यक असतात. जेथें फक्त मॅनेजिंग डायरेक्टर असतो, तेथें अगदीं वरच्या थराची व्यवस्था त्याच्या नेतृत्वाखालीं ठीक चालते. परंतु इतर सर्व पातळीवरील व्यवस्थेसंबंधीं तसें म्हणतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजन्सी असली म्हणजे कंपनीच्या सर्व थरांच्या जागीं जबाबदारीच्या भूमिकेवरून कामें करणारी मंडळी असूं शकतात. लिमिटेड कंपन्यांत नेहमींच सर्व गोष्टी ठराविक नियमानुसार कराव्या लागतात आणि जबाबदारी पत्करणाऱ्या एजन्सींतील मंडळी काम करीत असली तर काम सुकर होतें.

(४) मॅनेजिंग एजन्सी पद्धतीमुळें व्यवस्थापक, आर्थिक व कायदेविषयक तज्ज्ञ, इंजिनिअर्स, इत्यादींचें सहकार्य संघटितपणें मिळूं शकतें. टाटांच्या सर्व कंपन्यांच्या व्यवस्थेसाठी नुकतीच एक स्वतंत्र मॅनेजिंग एजन्सी कंपनी स्थापण्यांत आली. ह्या मॅनेजिंग एजन्सी कंपनीच्या बोर्डावर सर्व प्रकारचे तज्ज्ञ लोक काम करीत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा कंपन्यांना मिळत आहे. परंतु ह्या बोर्डाचा पगार व खर्च ह्यांचा बोजा मॅनेजिंग एजंटच पत्करीत आहेत. मोठ्या कंपन्यांची व्यवस्था डायरेक्टरांकडे आणण्यापेक्षा अशा संघटनेकडे असण्यांत केव्हांहि फायदाच आहे.

(५) ज्या कंपन्या चालवावयाच्या त्यांना लागणारें खेळतें भांडवल मॅनेजिंग एजंट मिळवून देतात. हें त्यांचें वैशिष्ट्य मान्य झालेलें आहे. कंपन्या जें कर्ज काढतात किंवा बँकांकडून ओव्हरड्राफ्ट घेतात त्यासाठी मॅनेजिंग एजंट गॅरंटी देतात. टाटा गटांतील कंपन्यांच्या बाबतींत—कारण त्यांत बरेच सुप्रतिष्ठित व महत्त्वाचे उद्योगधंदे आहेत—बँका अशी गॅरंटी मागत नसतील, अशी कल्पना असेल तर ती चुकीची आहे. सध्या त्या गटांतील कंपन्यांच्या बँकांकडील देण्यासाठी मॅनेजिंग एजंटांना दरसाल ५१ कोटी रुपयांपर्यंत गॅरंटी रहावें लागतें. एअर इंडिया इंटरनॅशनल लि. ह्या कंपनींत सरकारचें ४९% भांडवल आहे. तिच्या ५० लक्ष रुपयांच्या कर्जास मॅनेजिंग एजंट गॅरंटी राहिलेले आहेत; पण त्यांचा ऑफिस अलावन्स दरमहा २५० रुपये आहे. १९२३–३८ ह्या मुदतींत टाटा सन्स लि. ला जेवढा नफा मिळाला त्याच्या ७०% रक्कम त्यांना गॅरंटीच्या पोटीं भरावी लागली. टाटा गटासंबंधीं ही परिस्थिति आहे, तशी ती इतर जबाबदार एजंटांच्या बाबत कमीअधिक प्रमाणांत खरी असली पाहिजे.

(६) मोठाला धोका पत्करणें, स्वार्थत्याग करणें, दीर्घकाल भांडवल अडकवून ठेवणें, हें एका बाजूला व दुसऱ्या बाजूस उद्योगधंदे नीट प्रस्थापित झाले म्हणजे चांगला नफा मिळविणें, ही मॅनेजिंग एजन्सीचीं दोन अंगें आहेत. टाटा मिल्स (कापडगिरणी) व टाटा ऑइल मिल्स (साबण-तेलाचा भारतांतील सर्वांत मोठा कारखाना) ह्या दोन्हींचें अस्तित्व व वाढ हीं मॅनेजिंग एजंटांच्या स्वार्थत्यागामुळेंच शक्य झाली. टाटा केमिकल्सचें ह्याच संबंधांतील अगदीं ताजें उदाहरण आहे. ह्या कंपनीमध्यें मॅनेजिंग एजंटांचे ५० लक्ष रुपये गुंतलेले आहेत. त्यांच्या ठेवी बहुतेक बिनव्याजी आहेत. कंपनीचा कांहीं व्यवस्थाखर्च त्यांनींच केलेला आहे आणि तिच्या सुमारें एक कोटी रुपयांच्या कर्जास ते जामीन आहेत. ह्यामुळें कंपनी तगूं शकली असून हळूहळू ती स्थिरावत चालली आहे.

आपल्या देशांत बहुतेक सर्व क्षेत्रांत तज्ज्ञ व्यवस्थापक आणि तंत्रज्ञ ह्यांचा तुटवडा असतांना, जी कांहीं औद्योगिक प्रगति

झाली आहे, ती ज्यामुळें झाली त्या मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा नाश करण्याचा आदेश विधिमंडळास कां देण्यांत येत आहे तें कांहीं समजत नाहीं. ह्या पद्धतीची जागा घेणारी दुसरी कोणतीहि पद्धति कोणी सुचविलेली नाहीं. बँका आणि विमा कंपन्या ह्यांच्या बाबतींत मॅनेजिंग एजन्सी रद्द केल्याचा दाखला येथें उपयोगी पडण्याजोगा नाहीं. ह्या दोन व्यवसायांच्या वाढींत मॅनेजिंग एजंटांनीं फारसा भाग घेतलेला नव्हता. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत, मात्र प्राथमिक चौकशी, दूरदर्शीपणाचें नियोजन, धोक्यांचा पत्कर, दीर्घकाळ पूर्वतयारी, प्राथमिक अवस्थेंत जोपासना इत्यादि आवश्यक असतात आणि त्या बाबतींत मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें महत्त्वाची कामगिरी केलेली आहे.

## एका मध्यमवर्गीयाचें मासिक अंदाजपत्रक

( लेखक—श्री. ल. का. कुलकर्णी, अहमदनगर )

सध्याचे दिवस अंदाजपत्रकें सादर करण्याचे आहेत. मध्यवर्ती व प्रांतीय अर्थमंत्र्यांनीं आपापलीं अंदाजपत्रकें नुकतींच सादर केलीं आहेत. अशा वेळेस श्री. पी. के. अरुण यांनीं आपलें खासगी अंदाजपत्रक 'भारत ज्योति'च्या ३० एप्रिल १९५० च्या अंकांत प्रसिद्ध केलें आहे. तें मुंबईला स्टेनोग्राफर असून त्यांचें मासिक उत्पन्न २४५ रुपये आहे. त्यांचा खर्च २५७ रुपये दाखविला आहे. मध्यमवर्गीयाला पगार पुरत नाहीं व त्यामुळें त्याची फार कुचंबणा होते असा दावा त्यांनीं मांडला आहे.

खरोखर, सध्या मध्यमवर्गीयांचे भयंकर हाल होत आहेत. मिळणारा पगार पुरत नाहीं त्यामुळें त्यांच्या आयुष्यांत सुखाचे क्षण क्वचितच दृष्टीस पडतात. माझ्या माहितींतल्या एका मध्यमवर्गीय कारकुनाचें मासिक अंदाजपत्रक पुढीलप्रमाणें आहे:—

| तपशील | रु. आ. पै |
|---|---|
| घरभाडें | २०—०—० |
| इले. लाईट चार्जेस | ३—६—६ |
| सरपण ४ मण | १२—०—० |
| कोळसा १ मण | ६—०—० |
| रेशन धान्य व साखऱ्या | १५—८—० |
| किराणा सामान व किरकोळ | १८—८—० |
| चहा कॉफी | १—४—० |
| दुधाचा रतीब | ७—८—० |
| घासलेट ( कुपनवरील ) | ०—१४—६ |
| भाजीपाला | ३—०—० |
| लॉंड्री चार्जेस | १—८—० |
| एकादें दैनिक व साप्ताहिक | २—८—० |
| कटिंग-दाढी | १—०—० |
| टपालखर्च | ०—१२—० |
| सिनेमा सर्व कुटुंबियांसह ( महिन्यांतून २ वेळेस सरासरी ) | २—१०—० |
| साबण व टूथ पावडर | १—१४—० |
| | ९७—५—० |
| प्रॉव्हिडंड हप्ता | ३—१२—० |
| कर्जफेड हप्ता | १०—०—० |
| | १११—१—० |
| म्हणजे समजा रुपये | ११२—०—० |

त्या कारकुनाला महिन्याला ९५ रुपये पगार मिळतो. म्हणजे महिन्याला १७ ते २० रुपये कर्जाऊ किंवा उसनवार घ्यावे लागतात. वरील पत्रकांत कापडाचा, पातळांचा किंवा पादत्राणांचा खर्च धरलेला नाहीं. शिवाय बिचाऱ्याला महिन्यांतून एकादे वेळेस तरी फळफळावळ खावयास मिळते कीं नाहीं कुणास ठाऊक ? त्याला सिगरेट, पान किंवा तंबाखू यांपैकीं कसलेंहि व्यसन नाहीं ही भाग्याची गोष्ट आहे!

यावरून असें दिसून येतें कीं, मध्यमवर्गीयाला मिळणारा पगार अपुरा पडतो. बरें, समाजांत प्रतिष्ठा टिकविण्यासाठी व्यवस्थित राहणी व इस्तरीचे कपडे वापरणें त्याला आवश्यक वाटतें. माझ्या माहितींतले कांहीं कारकून असे आहेत कीं, एकवेळेला घरीं खाण्याची टंचाई सोसतील परंतु दोन दिवसांनीं परीट घडीचे कपडे वापरतील. मिळणारा मासिक पगार अपुरा पडत असतांना सुद्धां त्यांना काटकसरीनें संसार करतां येत नाहीं. असें कां?

तो समाजरचनेचा दोष आहे असें म्हणतां येईल. 'कारकून' म्हणण्यापेक्षां 'क्लार्क' म्हणणें आवडतें. एंजिन ड्रायव्हर होण्यापेक्षां सटेघाशी करणें परवडतें. मेहनतीचें काम नको अशी आजच्या मध्यमवर्गीयांची स्थिति झाली आहे आणि त्यामुळेंच हा वर्ग दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे.

या उलट खालच्या वर्गाची स्थिति चांगली आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. घरांत पांच माणसें असलीं तर त्यांतील चार जण मिळवते असतात. प्रत्येकाचे ६० रुपये धरले तरी महिन्याला त्यांच्या घरांत २४० रुपये येतात. असें असतांना सुद्धां त्यांना पगार पुरत नाहीं म्हणून ओरड येतेच. मध्यमवर्गीय कुटुंबांत मिळवणारा एक व खाणारे सतरा अशी परिस्थिति असते. अशा परिस्थितींत मध्यमवर्गीयाचा उन्नति होण्यास कांहीं शक्यता आहे कां?

होय! आहे. पण प्रत्येक मध्यमवर्गीय कुटुंबानें त्याची जबाबदारी पाहून वागलें पाहिजे. अनावश्यक व चैनीच्या वस्तू यांना थारा देतां कामा नये.

वरील अंदाजपत्रक अगदीं लहान कुटुंबाचें आहे. पण समजा मिळवता एकच मुलगा आहे. वडील नाहींत. आई, बायको, पांच धाकटे भाऊ व चार बहिणी आहेत, अशा वेळेस त्या मिळवत्या मुलानें काय करावें? भावांच्या व बहिणींच्या शिक्षणाचा प्रश्न, लग्नाचा प्रश्न कसा सोडवावा? मिळणाऱ्या पगारांतून भावांच्या शिक्षणासाठी व बहिणींच्या लग्नासाठी कांहीं शिल्लक टाकतां येईल काय? प्रश्नांतच त्यांचीं उत्तरें आहेत!

आजच्या मध्यमवर्गीय कुटुंबाची सर्वसाधारण परिस्थिति ही अशी आहे. यांतून मार्ग काढणें हें आपलें काम आहे. मी सुद्धां एक मध्यमवर्गीयच आहें. आपला कैवार घेण्यास श्रीमंत, सावकार, व्यापारी किंवा श्रेष्ठवर्गीय धावून येणार नाहींत. त्यांना सहानुभूतीचा साक्षात्कार झाला तर नशीब!

मध्यमवर्गीयांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारा व त्यांतून मार्ग काढण्यास मार्गदर्शन करणारा लेख लवकरच सादर करीत आहें.

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## काळव्याच्या प्रदेशांत कपाशीची लागवड

### सरकी व खत पुरविण्याची व्यवस्था

मुंबई सरकारनें अधिक धान्य पिकवा मोहिमेस चालना देण्यासाठी १९४२ सालीं काळव्याच्या प्रदेशांत कपाशीची लागवड करण्यास बंदी केली होती. आतां सदरहू बंदी हुकूम सरकारनें रद्द केले असून काळव्याच्या व तळ्याच्या पाण्यावर जरीला किंवा सी. ओ. ४ या जातीच्या कपाशीची लागवड करण्यास परवानगी द्यावी असा आदेश दिला आहे.

कपाशीचें जास्तींत जास्त उत्पन्न येण्याच्या दृष्टीनें पेरणी लौकर करण्याची आवश्यकता असते. तेव्हां उन्हाळ्यांत कपाशीला पाणी द्यावें लागतें. तथापि चालू सालीं आधीच इतर पिकांना पाणी देण्याचें ठरविलें असल्यामुळें गिरणा काळव्याच्या प्रदेशांत कपाशीखालील फक्त १,००० एकर जमिनीस पाणी देतां येईल. त्याचप्रमाणें गोदावरी काळव्याच्या प्रदेशांत ७०० एकर जमिनीस, प्रवरा काळव्याच्या प्रदेशांत ४०० एकर जमिनीस आणि एकरूर तलावाच्या प्रदेशांत ४०० एकर जमिनीस पाणी देतां येईल.

यासाठी अर्ज मागवून, शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें कपाशीच्या लागवडीसाठी योग्य जागा निवडून आणि १५ मे नंतर कपाशीला हंगामपूर्व पाणी देण्याची व्यवस्था करून उपरोक्त हुकूम अंमलांत आणावेत, असें संबंधित एक्झिक्युटिव्ह इंजीनिअरांना सांगण्यांत आलें आहे.

### सरकी व खताचा पुरवठा

इरिगेशन खात्यानें ज्यांचे अर्ज मंजूर केले आहेत त्या शेतकऱ्यांना सरकी व खत पुरविण्याची व्यवस्था करण्यासंबंधीं शेतकी खात्यालाहि आदेश देण्यांत आला आहे. सदरहू अर्जांतील तपशील संबंधित शेतकी अधिकाऱ्याकडे सादर केला पाहिजे.

त्याचप्रमाणें लिफ्ट इरिगेशनच्या सहाय्यानें कापूस, ऊस व पैसे देणारीं पिकें काढण्यासहि परवानगी देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. या हुकुमामुळें अधिक जमीन कपाशीच्या लागवडीखालीं येईल अशी आशा आहे.

---

### देवकरण नानजी इन्व्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल २५ लक्ष रुपये असून डिव्हिडंड इ. फंड १३ लक्ष रुपयांचा आहे. कंपनीनें २२ लक्ष, ८९ हजार रुपये जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या ऑर्डिनरी शेअर्समध्यें गुंतवले असून २ लक्ष, ३७ हजार रुपये प्रेफरन्स भागांत गुंतवले आहेत. शेअर्समधील एकूण गुंतवणूक २५,२५,७७४ रु. आहे, त्याची बाजारभावानें किंमत १९,०४,६२८ रु. आहे. जिंदगीचे बाजूस १,४२,५०० रु. अंडर रायटिंग कमिशन अद्याप शिल्लक आहे. ३१ मार्च, १९५० अखेर संपलेल्या वर्षी कंपनीला डिव्हिडंडच्या रूपानें ९४,०९९ रु. मिळाले. इन्व्हेस्टमेंट विक्रीवरील नफा ३०,८३३ रुपये जमाखातीं आहे. ७,५०० रु. अंडररायटिंग कमिशन लिहून टाकल्यावर व १२,०६८ रु. मॅ. एजन्सीचें कमिशन दिल्यावर अहवालाचे वर्षाचा ६९,८७५ रु. नफा ताळेबंदांत येतो. ३% करमाफ डिव्हिडंडसाठी ७५,००० रु. लागतील. (चेअरमनः श्री. प्राणलाल देवकरण नानजी. मॅनेजिंग एजंटसः देना सन्स लि.)

---

### लॉ ॲकॅडेमी बुलेटिन

नव्या नव्या कायद्यांत इतकी एकसारखी भर पडत आहे, कीं दक्ष कायदेपंडितासहि त्या सर्वांचें आकलन करणें कठीण जात आहे. कायदे, कानू, हुकूम ह्यांच्या जंजाळांतून चालू अंमलबजावणीच्या बाबी हुडकून काढाव्या लागतात. पुणें येथील लॉ ॲकॅडेमी ह्या संस्थेनें मार्गदर्शन करण्यासाठीं एक बुलेटिन सुरू केलें आहे. त्याचा पहिला चार पृष्ठांचा अंक १ मे, १९५० रोजीं प्रसिद्ध झाला आहे. कायद्यांविषयक महत्त्वाच्या बातम्या देणें आणि मुद्दे चर्चेसाठीं मांडणें, हाहि प्रस्तुत बुलेटिनचा एक उद्देश आहे. (संपादक, प्रकाशक व मुद्रकः श्री. श्री. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी., लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २. वा. वं.: ट. ख. सह १ रु. मॅनेजर, ७२० सदाशिव, पुणें २.)

---

**जागतिक-आरोग्य संघटनेची वर्गणी**—ह्या संघटनेच्या सभासद राष्ट्रांपैकीं २४ राष्ट्रांनीं १९४९ सालीं आपली वर्गणी भरली नाहीं. १९४९ सालीं भारताच्या चलनाचें अवमूल्यन झालें असतांना सुद्धां भारतानें आपली सर्व वर्गणी भरली. भारताकडून १,५६,९९२ डॉलर्स इतकी वर्गणी अपेक्षित होती.

**अमेरिकन बँकांचा नफा**—अमेरिकन बँकांना १९४५ नंतर १९४९ सालीं सर्वांत अधिक नफा झाला. देशांतील १३,४३६ प्रमुख बँकांना मिळून गेल्या वर्षी ८३ कोटी १० लक्ष डॉलर्स निवळ नफा झाला. ह्या रकमेंत प्राप्तीवरील कर धरलेला नाहीं. १९४५ सालापेक्षां नफ्याची रक्कम ८ टक्क्यांनीं अधिक आहे.

---


## ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी.

## नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची एकोणतिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें रविवार ता. ४ जून सन १९५० रोजीं दोन प्रहरीं ४–३० वाजतां खालील कामकाजाचा विचार करणेंसाठीं भरणार आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-१९४९ अखेरची हिशोब तपासनिसांनीं तपासलेले ताळेबंद व नफातोटापत्रकें स्वीकारून त्यास मंजुरी देणें.

(२) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा, श्रीमंत जगन्नाथमहाराज पंडित व शेठ हाजी अहिमहंमद कासम हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा पाळीप्रमाणें सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागांसाठीं उभे आहेत.

(३) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(४) याखेरीज ऐनवेळीं जीं कामें चेअरमन सभेपुढें मांडतील त्याचा विचार करणें.

कंपनीची शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १५ मे ते ५ जून १९५० अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

ओगलेवाडी. ता. २४ मार्च १९५० } बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून एस. पी. ओगले आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस.

सूचनाः—आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल असल्यास तो कृपा करून कंपनीकडे सत्वर कळवावा.

## "मुंबई राज्यांत तेल घाण्यांना संरक्षण द्या"

### नाडकर्णी समितीच्या शिफारसी


मुंबई राज्यांत ग्रामीण भागांतील तेलाच्या घाण्यांना संरक्षण देण्याबाबतच्या प्रश्नाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी मुंबई सरकारनें एक समिती नेमली होती. त्या समितीनें या धंद्यास आर्थिक सहाय्य देण्याच्या दृष्टीनें दोन योजनांची शिफारस केली आहे. सदरहू समितीनें आपल्या अहवालांत म्हटलें आहे कीं सध्या या धंद्यास देण्यांत येणाऱ्या सवलती अपुऱ्या आहेत आणि त्यांना देण्यांत यावयाचें साहाय्य परिणामकारक होईल इतक्या प्रमाणांत देण्यांत यावें. निरनिराळ्या तुटपुंज्या योजनांचा आधार घेण्यापेक्षा या प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन या धंद्याच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर करणें हें अधिक चांगलें, या मूलभूत तत्वावर समितीच्या सर्व शिफारसी आधारलेल्या आहेत.

### सहकारी संस्था योजना

समितीनें सुचविलेल्या दोन योजनांपैकी एक योजना राज्यांत ५०० ते ६०० सहकारी संस्था स्थापण्यासंबंधींची आहे. प्रत्येक संस्थेंत ठोकळमानानें २० घाणींचा आणि त्या चालविणाऱ्या सर्व तेल्यांचा समावेश करावा. त्याचप्रमाणें तेलबियांच्या उत्पादकांपैकी ५० टक्के उत्पादक आणि याच प्रमाणांत तेल व पेंढ यांच्या गिऱ्हाइकांना सहकारी संस्थेंत स्थान द्यावें. सध्या फार सावकाशीनें सहकारी संस्था स्थापन करण्यांत येत आहेत आणि अशा संस्थांत फक्त तेलीच असतात त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्यांना त्यांत स्थान नाहीं. सध्याच्या संस्थांमुळें उत्पादनाचा खर्च कमी होत नाहीं किंवा तेल्यांपुढील सर्व प्रश्नहि सोडविले जात नाहींत, असें समितीनें म्हटलें असून तेली, तेलबियांचे उत्पादक व गिऱ्हाइक यांच्यामध्यें अधिक स्नेहपूर्ण संबंध प्रस्थापित होण्याची आवश्यकता आहे असेंहि समितीनें पढें आग्रहानें सांगितलें आहे. अशा प्रकारच्या सहकारी संस्थांना उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट सवलती देण्याचीहि समितीनें शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें उत्पादनाचा खर्च कमी करून हा धंदा स्वावलंबी होण्याच्या दृष्टीनें समितीनें अशा संस्थांना कांहीं उपायांची शिफारस केली आहे.

### सुधारलेल्या घाणीचा प्रसार

पुणें येथील ग्रामोद्योग शाळेच्या तर्फें तेल घाणीकरितां एक महिन्याचा शिक्षणवर्ग चालविला जातो हें सर्वश्रुत आहेच. वंशपरंपरागत तेली जे आहेत त्यांना २५ ते ३५ रुपयांच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. पण निरनिराळ्या जिल्ह्यांतील अनेक वैयक्तिक सोसायट्यांकडून अर्ज आले आहेत या सर्वांच्या विनंतीला ताबडतोब मान देणें शक्य होत नाहीं. शिवाय पुणें येथें खर्चहि फार लागतो. म्हणून ग्रामोद्योग प्रयोगशाळेच्या पोटसमितीनें, जे जिल्ह्यांतील तेली लोकांना शिक्षण देण्यास व जिल्ह्यांतील लोकांना निर्भेळ तेल पुरविण्यास तयार आहेत अशा जिल्हा औद्योगिक सहकारी संघांना प्रत्येकीं एक घाण्याचा संच मोफत पुरवायचें ठरविलें आहे. हा घाणा चालविण्यासाठी १५ फूट × १५ फूट अशी निवाऱ्याची जागा, एक कमीत कमी ८०० पौंड वजनाचा बैल, १०८" मधला व्यास असलेला लांकडी ओंडका अगर उपयुक्त अशी दुसरी लांकडी उखळी आवश्यक आहेत. औद्योगिक सहकार व ग्रामोद्योगाचे यंत्रविशारद यांनीं याबाबतींत पुढें पाऊल टाकण्याच्या इराद्यानें सर्व जिल्हा संघांना त्यांचीं मतें पाठविण्याची विनंति केली आहे.

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दी

**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी :

सर वईवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.


हे पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.